I J R S S I S,Issue (VIII), Vol. II, Jan 2023 : 526-528

A Double-Blind Peer Reviewed Journal

OPEN ACCESS

e-ISSN 2347 – 517X

Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# एकविसाव्याा शतकातील आवश्यक मृदुकौशल्य आणि व्यक्तिमत्व विकास

गजानन रामाजी घुमडे

इतिहास विभाग, कर्मवीर महाविद्यालय, मूल

Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**

मृदु कौशल्यामध्ये संभाषन श्रवण भावनिक बाबीचा समावेश होत असतो. जसे की, सहानुभती आणि स्ववानुभुती (अनुभुती) हे मृदुगुण व्यक्तीच्या आचरणात व्यक्तीमत्वात आणि चारित्रातून झळकत असतात. सामाजिक जिवन जगत असतांना व्यक्तीला एक यशस्वी जीवन जगण्याकरीता हे गुण अंगी असणे अतिशय महत्वपूर्ण ठरत असतात.

एकविसावे शतक हे आधुनिक स्पर्धेचे युग आहे. या शतकात माहिती तंत्रज्ञान औद्योगिकरण सामाजिक बदल यामध्ये वेगाने बदल आणि विकास घडून येताना दिसत आहे. अशा युगामध्ये टिकण्याकरीता आपल्यामध्ये ज्ञाना बरोबरच इतर मृदुगुणाचा विकास होणे गरजेचे आहे. मृदुगुण म्हणजे इतरांकडून आपले कार्य करून घेणे. एखाद्या व्यक्तिकडून, संघटनेकडून, संस्थेकडून, कर्मचा-याकडून, अधिका-याकडून आनंदीरित्या कार्य घडून आणण्याचे कौशल्य होय. या मध्ये स्वत: बद्दलची जाणिव व्यक्तीगत व्यवस्थापन संघटन, सामाजिक बांधीलकी ज्ञान, आत्मविश्वास, वेळेचे व्यवस्थापन, आपत्ती निवारणकौशल्य, संभाषणकौशल्य, स्वंयप्रेरणा इ. घटक येतात. मृदुकौशल्य हे व्यक्ती कर्मचारी संघटना, प्राध्यापक, शिक्षक, खेडाळू, राजकिय नेते, व्यापारी इत्यादी लोकांकरीता आवश्यक आहे. एकविसाव्या शतकातील परिस्थितीनुसार मानवाला यशस्वी होण्याकरीता मृदुकौशल्य आणि व्यक्तिमत्वविकास याची गरज आहे. मृदु कौशल्यामध्ये संभाषन श्रवण भावनिक बाबींचा समावेश होत असतो. जसे की, सहानुभती आणि स्ववानुभुती (अनुभुती) हे मृदुगुण व्यक्तीच्या आचरणात व्यक्तीमत्वात आणि चारित्रातून झळकत असतात. सामाजिक जिवन जगत असतांना व्यक्तीला एक यशस्वी जीवन जगण्याकरीता हे गुण अंगी असणे अतिशय महत्वपूर्ण ठरत असतात.

**बिजशब्द :** संभाषन श्रवण मृदुकौशल्य यक्तिमत्व विकास.

**प्रस्तावना :**

एकविसावे शतक हे आधुनिक स्पर्धेचे युग आहे. या शतकात माहिती तंत्रज्ञान औद्योगिकरण सामाजिक बदल यामध्ये वेगाने बदल आणि विकास घडून येतांना दिसत आहे. अशा युगामध्ये टिकण्याकरीता आपल्यामध्ये ज्ञानाबरोबरच इतर मृदुगुणाचा विकास होणे गरजेच`आहे. मृदुगुण म्हणजे इतरांकडूनआपले कार्य करून घेणे. एखाद्या व्यक्तिकडून, संघटनेकडून, संस्थेकडून, कर्मचा-याकडून, अधिका-याकडून आनंदीरित्या कार्य घडून आणण्याचे कौशल्य होय. या मध्ये स्वत: बद्दलची जाणिव व्यक्तीगत व्यवस्थापन संघटन, सामाजिक बांधीलकी ज्ञान, आत्मविश्वास, वेळेचे व्यवस्थापन, आपत्ती निवारण कौशल्य, संभाषण कौशल्य, स्वंयप्रेरणा इ. घटक येतात. मृदु कौशल्य हे व्यक्ती कर्मचारी संघटना, प्राध्यापक, शिक्षक, खेडाळू, राजकिय नेते, व्यापारीइत्यादी लोकांकरीता आवश्यक आहे.

एकविसाव्या शतकातील परिस्थितीनुसार मानवाला यशस्वी होण्याकरीता मृदुकौशल्य आणि व्यक्तिमत्वविकास याची गरज आहे. खालील प्रकारे आधुनिक काळातील मृदु कौशल्य हे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी गरजेचे आहे. साधारणत: मृदु कौशल्याचे तीन विभागात वर्गीकरण करण्यात येते.

**भाग एक :-**

**गांभीर्याने विचार करणे**

गांभीर्याने विचार करणे म्हणजे कोणत्याही गोष्टीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्याचे कौशल्य असणे थोडक्यात म्हणजे प्रामाणिकपणा वैचारिक

मोकळेपणा, वैचारिक पातळीवर सतत क्रियाशील असणे. प्रश्न विचारण्याचा किंवा प्रश्नांची उत्तरे देण्याची तयारी असणे. स्वतंत्र वैचारिक बैठक असणे. समस्यांचे निराकरण करण्याचे कौशल्य असणे म्हणजे गांभीर्याने विचार करणे.

**संपर्क**

आज संपर्काची माध्यमे बदलली असली तरी प्रभावी संपर्क करता येण्याची हातीही असणे आवश्यक आहे. एकच संदेश वेगवेगळया लोकांपर्यत वेगवेगळया माध्यमाद्वारे पोहचवणे किंवा स्वत:कडील विचार कल्पना, भावभावना इत्यादी बाबी प्रभावीपणे इतरापर्यंत ही कौशल्ये प्रभावी संपर्कासाठी आवश्यक आहेत.

**सजनशिलता**

नवनविन कल्पना अयशस्वीपणे सुचने, वेगवेगळया बाजूंनी विचार करतांना कोणत्याही विचारांशी बाधीन न राहता लवचिकपणे सर्व बाजू तितक्याच प्रभावीपणे विचारात घेणे. इतरांच्या कल्पनांचा सहजपणे विस्तार करता येणे. इत्यादी कौशल्ये सर्जनशिलता मुख्य अंग आहेत.

**सहकार्य**

सहकार्य म्हणजे इतरांबरोबर एक संघ म्हणून प्रभावीपणे काम करता येण्याची समता असणे. संघ म्हणून काम करत असतांना काही निर्माण होणे आवश्यक असतात. आणि ते निर्णय आपण एकमेकांच्या सहकार्याने घेत असतो. त्यावेळी इतरांच्या मताचा आदर ठेवून संघभावनेने कार्य करता येण्याचे कौशल्य असणे म्हणजे सहकार्य होय.

**भाग दोन :-**

**साक्षरता**

पारंपारिक पध्दतीने माहिती असलेली साक्षरता महत्वाची आहेच. पण त्याच बरोबरिने २१ व्या शतकात साक्षरतेचे काही इतर पैलू आत्मसात करणे आवश्यक आहे. साक्षरतेच्या ३ उपप्रकारांची खालील प्रमाणे विभागणी केलेली आहे.

**माहिती साक्षरता**

माहिती साक्षरता म्हणजे काय? सक्षमपणे माहिती मिळविणे आणि त्या माहितीचे विश्लेषण करण्याची क्षमता असणे उदा. इंटरनेटवरून एखाद्या विषयाची माहिती घेवून त्या निस्तृत

माहितीचा अभ्यास/विश्लेषण करणे. माहितीचा योग्य आणि सर्जनशिल व्यापर करून कोणालाही अमरयेचे निराकरण करणे अनेक ठिकाणावरून येणारी माहिती हाताळणे इत्यादी म्हणजे माहिती साक्षरता.

**माध्यम साक्षरता**

एखाद्या माध्यमासाठी तयार करण्यात येणा-या मजकुराचा हेतू लक्षात घेणे एखाद्या मजकुराचा वेगवेगळया पध्दतीने अर्थ लावण्याची क्षमता असणे. कोणतेही माध्यम वापरण्या विषया नैतिक तसेच कायदेशीर बाजुंची माहिती असणे. इत्यादी म्हणजे माध्यम साक्षरता.

**तंत्रज्ञान साक्षरता.**

तंत्रज्ञानाचा वापर संशोधन करण्यासाठी, दैनदिन जीवनात आवश्यक असणारी माहिती गोळा करण्यासाठी तिचे विश्लेषरण करण्यासाठी करता येण्याचे कौशल्य असणे म्हणजे तंत्रज्ञान साक्षरता. आज आपण तंत्रज्ञानाशिवाय राहू शकत नाही म्हणून हे कौशल्य सर्वांना येण खुप आवश्यक आहे.

**भाग तीन :-**

**जीवन कौशल्य**

नावाप्रमाणेच जीवन कौशल्य म्हणजे व्ययक्तीक जीवनात आवश्यक असणारी कौशल्य असणे. बहुतांश ही कौशल्ये व्ययक्तीक जीवनात जास्त उपयोगी ठरत असली तरीही त्यांचा वापर व्यावसायिक आयुष्यात देखिल होतो.

**लवचिकता**

कामाच्या बाबतीत अथवा इतर बाबींमध्ये देखिल लवचिकता असणे. सतत आपल्या सभोवताला घडणा-या बदलांना सामोरे जाऊन त्या बदलांचा

स्विकार करणे व त्यांच्याशी जूळवून घेणे म्हणजे लवचिकता आणि लवचिकता शिवाय आपणाला यश प्राप्त होत नाही.

**नेतृत्व**

काम करून इतरांना पुढे घेऊन जाण्याचे कौशल्य असणे वेगवेगळया पध्दतीने संघाकडून सर्वोत्तम कामगीरी करून घेण्याची क्षमता असणे म्हणजे नेतृत्व गुण होय. नेतृत्व क्षमतेशिवाय आपण यशस्वी होऊ शकत नाही.

**यशस्वी पुढाकार**

कोणतेही कार्य करण्यासाठी पुढाकार घेण्याचे कौशल्य असणे अंतकरणातून उर्जा घेऊन वेगवेगळी काम सुरू करण्याचे कौशल्य असणे म्हणजे यशस्वी पुढाकार.

**उत्पादकता**

ठराविक वेळेत अधिकाधिक चांगले कार्य करता येणे तसेच वेळेचा सदुपयोग करून वेगवेगळया विचारांचा मुर्त स्वरूप येणे हे कौशल्य आपल्या अंगी रूजविणे आवश्यक आहे.

**सामाजिक कौशल्ये**

वेगवेगळया शहरांत राज्यात देशांमध्ये, संस्कृतीमध्ये सहजपणे मिसळून घेऊन स्त्रियांना लोकांबरोबर काम करता येण्याचे कौशल्य असणे म्हणजे सामाजिक कौशल्य होय.

सध्याच्या भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये विद्यार्थ्यांना ही कौशल्ये आत्मसात करता येतातच असे नाही. म्हणून इतर ठिकाणांवरून ही कौशल्ये आत्मसात करून स्वत:चा विकास करणे क्रमप्राप्त ठरते.

जीवनात यशस्वी होण्यासाठी तुमच्याकडे जर ही कौशल्ये असतील तर २१ व्या शतकात यशस्वी होण्यापासून तुम्हाला कोणीही थांबवू शकणार नाही.

२१ व्या शतकामध्ये मानवाला विविध क्षेत्रामध्ये आपले यशस्वी व्यक्तीमत्व निर्माण करण्याकरीता वरिल मृदु कौशल्याचे आवश्यकता आहे. उदा. एखाद्या शिक्षकाला आपल्या शाळेत आपले यशस्वी व्यक्तीमत्व सिध्द करण्याकरीता ज्ञानासोबतच वरिल मृदु कौशल्य जर नसेल तर तो एक यशस्वी शिक्षक होऊ शकणार नाही. म्हणून ही आजच्या शतकातील अत्यंत महत्वपूर्ण घटक आहे.

संदर्भ :-

Personality development and Soft Skills- Preparing for tomorrow by shikha kapoor, IK International, 2018

https://www.isdm.org.in/blog/soft-skills-required-social-sector

https://humanjourney.us/health-and-education-in-the-modern-world/education